# अभ्यासक्रम सुधारणाबाबत विद्यापीठाचे क्रांतीकारक व ऐतिहासिक पाऊल -कुलगुरू






संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांना सी.बी.सी.एस. लागू करण्याचा विद्या परिषदेने निर्णय घेतला असून त्यानुसार नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या तरतूदीच्या अनुषंगाने रोजगारक्षम विद्यार्थी घडावेत, यादृष्टिने सर्वच शाखेतील अभ्यासक्रम सुधारणाबाबत विद्यापीठाने क्रांतीकारक व ऐतिहासिक पाऊल उचलले असून यासाठी व्दिदिवसीय अभ्यास मंडळाच्या सभांमध्ये येत्या शैक्षणिक सत्र २०२२ पासून अभ्यासक्रम लागू करण्याच्या दृष्टिने नव्याने अभ्यासक्रम तयार होतील, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी केले. यावेळी व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ. व्ही.एस.चौबे, व्य.प. सदस्य प्रा. दिनेश सूर्यवंशी, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता डॉ. एस.व्ही. डुडुल, डॉ. डी. डब्ल्यु. निचित, डॉ. वैशाली गुडधे, कुलसचिव, डॉ. तुषार देशमुख, एच.आर.डी.सी. चे संचालक डॉ. प्रसाद वाडेगांवकर, प्राचार्य, डॉ. ए.बी. मराठे उपस्थित होते.

कुलगुरू म्हणाले, ब–याच दिवसांपासून अभ्यासक्रम बदलले नव्हते, त्यामुळे अभ्यासक्रम बदलण्याची गरज होती. सी.बी.सी.एस. व एन.ई.पी. वर अनेक कार्यशाळांचे आयोजन विद्यापीठाने तसेच महाविद्यालयांनी सुध्दा केले. अभ्यासमंडळांच्या सदस्यांना सी.बी.सी.एस. विषय समजावा आणि नवीन अभ्यासक्रम तयार करण्यासाठी मदत मिळावी, याहेतूने एकत्रित सभा घेण्यात आल्या असून या सदस्यांच्या माध्यमातून पुढील महिन्यात पाचशे प्रशिक्षण कार्यक्रमाव्दारे सर्व शिक्षक, विद्यार्थी व समाजापर्यंत हा विषय पोहचला जाईल. विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा, यासाठी अभ्यासक्रमात योग्य ते बदल होणे आवश्यक होते. यानिमित्ताने आमच्या विद्यार्थ्यांना रोजगाराची नवी दालने व संधी उपलब्ध होतील, असे ते म्हणाले. प्र– कुलगुरू डॉ. व्ही.एस. चौबे म्हणाले, विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा, यासाठी चांगले व अनुरूप अभ्यासक्रम अभ्यास मंडळाच्या सदस्यांना तयार करायचे आहेत. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून रोजगाराची विपुल दालन तयार व्हायला हवीत. रोजगारासाठी सक्षम विद्यार्थी आम्हाला घडवायचा आहे. ‘अमरावती युनिव्हरसिटी रिफॉर्म्स इन ॲकेडेमीक ही चांगली थीम कुलगुरूंनी यासाठी ठेवली असल्याचे त्यांनी सांगितले.

कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांना प्रास्तविकेतून द्विदिवसीय अभ्यास मंडळाच्या सभा आयोजित करण्यामागील भूमिका विषद करतांना सांगितले की, आदर्श अभ्यासक्रम तयार होणार असून त्यासाठी सर्व सदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. संचालन डॉ. सुजाता काळे तर आभार डॉ. मनिषा कोडापे यांनी मानले.

# चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टीम फिडबॅक सभेप्रसंगी मार्गदर्शन

## देशातील विद्यार्थी कौशल्याधिष्ठीत व्हावे - कुलगुरू




चीनची उत्पादकता जगात अधिक आहे. त्या देशात विविध कौशल्ये नागरिकांनी आत्मसात केली असून भारतातील विशेषतरू संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना रोजगारासाठी आवश्यक असलेली विविध कौशल्ये आत्मसात करण्याकरिता चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टीम नुसार तयार होत असलेला अभ्यासक्रम महत्वाचा असून नवीन अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना कौशल्याधिष्ठीत करणारा असल्याचे मत कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी अभ्यास मंडळाच्या सदस्यांकडून फिडबॅक घेतांना व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर प्र–कुलगुरू डॉ.व्ही.एस. चौबे, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता डॉ. संजय डुडूल, डॉ.डी.डब्ल्यु. निचित, डॉ. वैशाली गुडधे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व एच.आर.डी.सी. चे संचालक डॉ. प्रसाद वाडेगांवकर उपस्थित होते.

अभ्यास मंडळाच्या सदस्यांनी अभ्यासक्रम तयार करण्यासंदर्भामध्ये असलेल्या सुधारणा, उणिवा आणि दर्शविलेली सकारात्मकता ऐकून घेतल्यानंतर मार्गदर्शन करतांना कुलगुरू म्हणाले, आपल्याला सुधारणा करण्यास प्रचंड वाव आहे. अभ्यासक्रम तयार करणे आव्हानात्मक असून आपण ते आव्हान स्वीकारले आहे. त्यासाठी सामुहिक प्रयत्नांची गरज असून तशाप्रकारचे प्रयत्न आपण सर्व करीत आहोत. महाविद्यालयांनी महाराष्ट्रातील उत्कृष्ट महाविद्यालयांशी विद्यार्थी आदान–प्रदान करण्यासंदर्भात सामंजस्य करार करावा, त्यामुळे विद्यार्थ्यांना इतर महाविद्यालयातील चांगल्या गोष्टी शिकता रोजगाराची अनेक क्षेत्र आहेत, ती शोधण्याची सध्या गरज असून त्यानुरुप अभ्यासक्रम तयार झाल्यास आमच्या विद्यार्थ्यांना कौशल्ये मिळतील व त्याला रोजगार मिळविणे किंवा स्वतरूचा उद्योग वा व्यवसाय सुरु करणे सहज शक्य होईल. महाविद्यालयांना काही अडचणी असल्यास त्यांनी कुलगुरूंना मेलवर कळवाव्यात, असेही त्यांनी सांगितले.

अभ्यास मंडळाचे सभासद डॉ. अनिल करवंद, प्राचार्य डॉ. प्रसाद खानझोडे, डॉ. स्वानंद पुंड, डॉ. गजानन गुल्हाने, डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. मोना चिमोटे, डॉ. हेमंत खडके, डॉ. वशिष्ठ चौबे, प्राचार्य डॉ. विजय नानोटी, प्राचार्य डॉ. उदय नावलेकर, डॉ. प्रमोद गारोडे, डॉ. प्रसाद वाडेगांवकर, डॉ. जयंत गुप्ता, डॉ. ममता इंगोले, डॉ.एस.व्ही. डुडूल यांचेसह इतरांनी फिडबॅकप्रसंगी आपले मत मांडलेत.